गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

वर्ष १ ले | अंक २८२ वा | रविवार ०३ मार्च २०२४ | पाने ४ | किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 282 | Date : 03/03/2024 | blow :Sunday | Page 4 | Price 4

## भव्य 'नमो महारोजगार मेळाव्या'सह विविध विकास कामांचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन

बारामती : नमो महारोजगार मेळाव्यातून तरुणाईला स्वतःचे आणि राज्याचे भविष्य घडविण्याची एक मोठी संधी मिळाली आहे असे सांगतानाच बारामती येथे आयोजित या मेळाव्यातून २५ हजार युवांना रोजगार मिळेल असा विश्र्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. बारामती शहर हे एक विकासाचे प्रारूप (मॉडेल) आहे असेही यावेळी ते म्हणाले.

विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्यावतीने आयोजित पुणे विभागस्तरीय 'नमो महारोजगार मेळाव्या'च्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी बारामतीतील विविध विकास कामांतर्गत बऱ्हाणपूर येथील पोलीस उपमुख्यालय, बारामती बस स्थानक, अपर पोलीस अधीक्षक, वाहतूक शाखा, बारामती पोलीस ठाणे तसेच पोलीस वसाहतींचे उद्घाटन पोलीस वाहनांचे लोकार्पणही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी विधान परिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील, उद्योग मंत्री उदय सामंत, कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा, ज्येष्ठ खासदार शरद पवार, खासदार सुप्रिया सुळे, आमदार दत्तात्रय भरणे आदी उपस्थित



होते.मेळाव्यात तरुणाईला मार्गदर्शन मिळेल आणि रोजगारही उपलब्ध होईल. यापूर्वी नागपूर, लातूर, अहमदनगर येथे मेळावे झाले असून बारामती येथे आयोजित हा मेळावा सर्व विक्रम मोडणारा असून यातून २५ हजार युवांना रोजगार मिळेल, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

**बारामती शहर विकासाचे मॉडेल** बारामती शहर हे एक विकासाचे प्रारूप (मॉडेल) आहे. शहराच्या विकासात शरद पवार, अजित पवार यांचे मोठे योगदान आहे. विकासकामे करताना सर्व कामे वेळेत आणि दर्जेदार व्हावीत हा उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा कटाक्ष असतो. आज उद्घाटन झालेल्या प्रकल्पांच्या दर्जात कुठेही तडजोड झाली नाही हे दिसून येते.

**१ लाख ६० हजार रोजगार दिले** राज्यात यापूर्वी नोकरभरती बंद होती. या शासनाने ७५ हजार रोजगार देण्याचे लक्ष्य ठेवले होते. त्या तुलनेत १ लाख ६० हजार रोजगार दिले आहेत. विविध नोकर भरती सुरू असून २२ हजार पोलिसांची भरती, ३० हजारावर शिक्षकांची पदे भरण्यात येत आहेत. त्यात मराठा समाजाला आरक्षण दिलेलेही समाविष्ट आहेत, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

**शासन आपल्या दारी मध्ये २ कोटी ६० लोकांना लाभ** शासन आपल्या दारी हा देखील राज्य शासनाचा लोकाभिमुख उपक्रम असून विविध योजना, शासन निर्णय असताना तसेच लाभार्थी असतानाही शासकीय कार्यालयात जाण्याची कटकट नको म्हणून लाभ सोडून देणाऱ्या नागरिकांना लाभ देण्यासाठी उपक्रम राबविण्यात आला. यात एकच छताखाली गरिबांना घरांचा, महिला बचत गट, शेतकऱ्यांना मिनी ट्रॅक्टर, पॉवर टिलर, ड्रोन, हार्वेस्टर आदी अनेक लाभ दिले. या कार्यक्रमातून २ कोटी ६० लाख लोकांना विविध लाभ देण्यात आले.

**प्रधानमंत्री कौशल्य विकास कार्यक्रमात राज्याचे पूर्ण योगदान** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी तरुणाईला थेट नियुक्तीपत्रे देण्याचा कार्यक्रमांतर्गत । पान २ वर

## सांगलीत हळदीला ३२ हजाराचा उच्चांकी भाव

सांगली : सांगली बाजार समितीमध्ये शनिवारी निघालेल्या हळद सौद्यामध्ये प्रती क्विंटल ३२ हजाराचा दर मिळाला असून यंदाच्या हंगामातील हा सर्वोच्च दर आहे. सदरची हळद संगमेश्र्वर ट्रेडर्स (काडाप्पा) यांच्या दुकानामध्ये श्री बसवराज भिमाप्पा दासनाळ (रा. कल्लोळी ता. मुडलगी जि. बेळगांवी) यांनी विक्रीसाठी आणलेली होती. सदरची हळद खरेदीदार मनाली ट्रेडींग कंपनी यांनी खरेदी केली. सध्या हळद या शेतीमालास उच्चांकी भाव मिळत असून त्याचा फायदा शेतकऱ्यांना होत आहे. याप्रसंगी मोठ्या प्रमाणात खरेदीदार , व्यापारी, शेतकरी, हमाल आदी उपस्थित होते. दर चांगला मिळत असल्याने शेतकऱ्यांनी आपली हळद सांगली बाजारात विक्रीसाठी आणावी असे आवाहन सभापती श सुजयनाना शिंदे व सचिव महेश चव्हाण यांनी केले आहे.

## मोदी सरकारकडून पहिल्या यादीत ३४ मंत्र्यांना उमेदवारी, नितीन गडकरींचं नाव नाही

नवी दिल्ली : भाजपाचे राष्ट्रीय महासचिव यांनी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर देशभरातल्या १९५ उमेदवारांची यादी जाहीर केली. या यादीत एकूण ३४ मंत्र्यांना स्थान देण्यात आलं आहे. मात्र पहिल्या यादीत नितीन गडकरींना स्थान नाही. त्यामुळे सगळ्यांच्याच भुवया उंचावल्या आहेत. विनोद तावडे यांनी भाजापाच्या उत्तर प्रदेशमधील ५१, पश्र्चिम बंगालमधील २०, मध्य प्रदेशमधील २४, गुजरातमधील १५, राजस्थानमधील १५, केरळमधील १२, तेलंगणामधील



९, आसाममधील ११, झारखंडमधील ११, छत्तीसगडमधील ११, दिल्लीमधील ५, जम्मू काश्मीरमधील २, उत्तराखंडमधील ३, अरुणाचल प्रदेशमधील २, गोव्यातील १, त्रिपुरामधील १, अंदमान निकोबारमधील १ आणि दिव-दमणमधील एका उमेदवाराच्या नावाची घोषणा केली. भाजपाने आज जाहीर केलेल्या यादीत एकूण २८ महिलांना उमेदवारी दिली आहे. केंद्रीय मंत्री स्मृती इराणी या पुन्हा एकदा अमेठी लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवताना दिसणार आहेत. तर भाजपाने हेमा मालिनी यांनाही उमेदवारी घोषित केली आहे. हेमा मालिनी या मथुरा लोकसभा मतदारसंघातून निडवणूक लढवणार आहेत. मात्र नितीन गडकरी यांचं नाव या यादीत कसं नाही? याची चर्चा आता रंगली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे पुन्हा एकदा वाराणसी लोकसभा । पान २ वर

## मुख्यमंत्र्यांच्या बालेकिल्ल्यात राहुल गांधींची सभा, भारत जोडो न्याय यात्रेदरम्यान ठाण्यात सभेचे आयोजन



ठाणे : राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ठाणे जिल्ह्यातून काँग्रेस नेते राहुल गांधी यांची भारत जोडो न्याय यात्रा १५ आणि १६ मार्च रोजी जाणार असून या यात्रेदरम्यान राहुल गांधी हे ठाणे शहरात सभा घेणार आहेत. लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर होणाऱ्या या सभेत राहुल गांधी काय भाष्य करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

राज्यातील महाविकास आघाडीचे सरकार कोसळून सत्तेवर आलेल्या महायुतीच्या सरकारच्या काळात ठाणे जिल्ह्याचे महत्व वाढले आहे. हा जिल्हा राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांच्या पार्श्र्वभूमीवर शिवसेना । पान २ वर

## आसारामची शिक्षा कायम; स्थगितीची मागणी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली



नवी दिल्ली : बलात्कार प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या आसाराम बापूची प्रकृती खालावत असल्याने शिक्षेला स्थगिती द्या, अशी मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी फेटाळली. त्याचे वय आणि गुंतागुंतीचे आजार लक्षात घेऊन शिक्षा स्थगित करा अशी मागणी या याचिकेद्वारे करण्यात आली होती. आसारामने महाराष्ट्रातील खोपोलीतील माधवबाग हृदय रुग्णालयात उपचार घेण्याचा आपला सल्ला स्वीकारला असल्याचे वरिष्ठ वकील मुकुल रोहतगी यांनी न्यायालयाला सांगितले. त्यानंतर न्या. संजीव खन्ना, न्या. दीपांकर दत्ता यांच्या खंडपीठाने रोहतगी यांना या प्रकरणी राजस्थान उच्च न्यायालयात जाण्याचे निर्देश दिले.

हेही वाचा तळवशे: गछ्ण मध्ये पुन्हा राडा; अभाविप व डाव्या विद्यार्थी संघटनेच्या विद्यार्थ्यांमध्ये हाणामारी, निवडणुकीचं वातावरण तापलं!

न्या. खन्ना यांनी या खटल्यातील दोषारोप आणि शिक्षेविरुद्ध उच्च न्यायालयासमोरील अपीलाच्या सुनावणीला जाणीवपूर्वक विलंब करण्याच्या आसारामच्या प्रयत्नाकडेही लक्ष वेधले.रोहतगी यांनी आसारामला अनेकदा हृदयविकाराचा झटका आल्याचे आणि वयाशी संबंधित इतर आजारांसोबतच तो गॅस्ट्रोइंटेस्टाइनल रक्तस्रावासह ॲनिमियाने ग्रस्त असल्याचे सांगितल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या अपीलची जलद । पान २ वर

## राहुल गांधींचा देश तोडण्याचा डाव; रामदास आठवले यांचा हल्लाबोल

कराड: राहुल गांधी एकीकडे भारत जोडो यात्रा काढत आहेत आणि दुसरीकडे देशाला तोडण्याचा, समाजात फूट पाडण्याचा त्यांचा डाव आहे. काँग्रेस व काही पक्षांनी केंद्रातील भाजप सरकार संविधान बदलणार अशी अफवा पसरवून समाज तोडण्याचेच काम केल्याचा हल्लाबोल केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे अध्यक्ष रामदास आठवले यांनी केला. सध्या राहुल गांधींनी काँग्रेस पक्ष जोडण्याचेच काम करणे त्यांच्या फायद्याचे असल्याचा परखड सल्लाही आठवले यांनी या वेळी दिला.साताऱ्यात ते पत्रकारांशी बोलत होते. 'रिपाइं'चे (आठवले गट) प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते या वेळी उपस्थित होते. काँग्रेस पक्षच जोडण्याचे त्यांनी काम करावे रामदास आठवले म्हणाले, लोकसभेच्या निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेस पक्ष सोडून अनेक दिग्गज मंडळी भाजपात जात आहेत. तरी राहुल गांधी यांनी देश जोडण्याऐवजी काँग्रेस पक्षच जोडण्याचे काम करणे त्यांच्या हिताचे ठरेल. राहुल गांधींचा देशभर फिरून काहीही उपयोग होणार नाही, माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेस नेते । पान २ वर

## वळसंग येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर ऐतिहासिक विहिर व स्मारक सुशोभीकरणास निधी कमी पडू देणार नाही : आ.सचिन कल्याणशेट्टी

वळसंग/प्रतिनिधीः ज्या भूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर येऊन गेले त्यांनी स्वतःच्या हाताने ज्या विहिरीचे पाणी चांदीच्या ग्लासा मधून रेशमी दोरीच्या सहाय्याने शेंदून उदघाटन केले त्या ऐतिहासिक विहिरीस निधी मंजूर करण्याचं भाग्य मला मिळालं हे माझं सौभाग्य समजतो. आणि या कामास निधी कदापी कमी पडू देणार नाही असे प्रतिपादन अक्कलकोट विधानसभा मतदारसंघांचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केले. वळसंग ता. दक्षिण सोलापूर येथील आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी मंजूर केलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर ऐतिहासिक विहिरीवर स्तूप व स्मारक सुशोभीकरण कामाचे भूमिपूजन त्यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी

माजी पालकमंत्री आ.दत्तात्रय भरणे हे होते.यावेळी मंचावर सोलापूर महानगरपालिका माजी गट नेते संयोजक आनंद चंदनशिवे, ऋत्व् ग्रुप संस्थापक बाळासाहेब वाघमारे, राष्ट्रवादी शहर अध्यक्ष संतोष पवार, जुबेर बागवान माजी नगरसेवक गणेश पुजारी, जिल्हापरिषद कार्यकारी अभियंता नरेंद्र खराडे, द. सोलापूर उपाभियंता उषा बिडला,शाखा अभियंता राजेश जगताप,कनिस्ट अभियंता सज्जन भडकवाड,सरपंच जगदीश अंटद, उपसरपंच कुरेशी, रवीबॉस कोळेकर,गौतम चंदनशिवे श्रीमंत जाधव चंद्रकांत सोनवणे सह संयोजक अनु जाती जिल्हा सरचिटणीस बलवान गोतसुर्वे आदी उपस्थित होते. अध्यक्षस्थानावरून बोलताना सोलापूरचे माजी पालकमंत्री आ.दत्तात्रय भरणे यांनी अक्कलकोट मार्गे गाणगापूर गुलबर्गा या ठिकाणी दर्शनासाठी जाणारा व्यक्ती हा वळसंगच्या ऐतिहासिक डॉ.आंबेडकर स्मारकास भेट देऊन जाईल अशा पद्धतीचे काम आमदार कल्याणशेट्टी करतील याची मला खात्री असल्याचे सांगितले. आपल्या प्रास्ताविकात संयोजक तथा सोलापूर महानगरपालिका माजी गटनेते आनंद चंदनशिवे यांनी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी या ऐतिहासिक स्थळास विना विलंब निधी दिल्याबद्दल त्यांचे तमाम भिमअनुयायी यांच्या वतीने आभार मानले आणि या भागातील सर्व भीम सैनिक आपल्या पाठीशी खंबीर उभे राहतील याची ग्वाही दिली. यावेळी उपसरपंच कमलाकर सोनकांबळे राहुल रुही, सिद्धाराम हेले, सुनील कळके, भाजपा अनु जमाती







अक्कलकोट तालुकाध्यक्ष निजप्पा गायकवाड, आचेगाव सरपंच विश्रांती पाटील, गौतम बाळशंकर, रमेश क्षिरसागर कार्यक्रमाचे सहसंयोजक सिद्धाराम वाघमारे, शांतकुमार गायकवाड ,अक्षय गायकवाड, कर्देहळळी सरपंच नागेश शिंदे, दुधनी कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक इरणा दसाडे, अविनाश भडकुंबे, अशोक गायकवाड, संतोष गायकवाड, आकाश माने, अमोल पुटगे, धोडूराज बनसोडे, यांच्यासह वळसंग व परिसरातील, अक्कलकोट व दक्षिण सोलापूर तालुक्यातील आजी माजी सरपंच उपसरपंच सदस्य पदाधिकारी भीम अनुयायी मोठया संख्येने उपस्थित होते. प्रस्ताविक व आभार संयोजक आनंद चंदनशिवे यांनी केले.

## संपादकीय

### याचाही विचार व्हावा. ..

अजित पवार यांनी सादर केलेला अंतरिम अर्थसंकल्प म्हणजे 'सर्वांसाठी सर्व काही' देणारा आणि लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कोणालाही न दुखावणारा अर्थसंकल्प आहे. अर्थसंकल्पाचे सादरीकरण करत असताना आपल्या भाषणाच्या शेवटी अजित पवार यांनी विरोधी पक्ष नेहमीच्या पध्दतीप्रमाणे या अर्थसंकल्पावर टीका करतील अशी अपेक्षा व्यक्त करत असताना कुसुमाग्रज यांच्या 'उगाच टीका करू नका' या आशयाच्या कवितेचा उल्लेख केला असला तरी या अर्थसंकल्पात काहीच नाही अशा प्रकारची टीका विरोधकांकडून होणे साहजिकच आहे. एक फेब्रुवारी रोजी ज्याप्रमाणे केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अंतरिम केंद्रीय अर्थसंकल्प सादर केला होता त्याच धर्तीवर अजितदादा यांनीसुध्दा महाराष्ट्राचा हा अंतरिम अर्थसंकल्प सादर केला आहे. निर्मला सीतारामन यांच्याप्रमाणे अजित पवार यांनीही निवडणुका डोळ्यांसमोर ठेवूनच सर्वांसाठी सर्व काही देण्याचे धोरण कायम ठेवले आहे, असेच दिसून येते. समाजाच्या स्तरातील कोणताच घटक उपेक्षित किंवा मागे राहणार नाही किंवा अनुल्लेखित राहणार नाही या प्रकारे या अंतिम अर्थसंकल्पाची रचना केल्याचे दिसते. राम जन्मभूमी असलेल्या अयोध्या येथे आणि काश्मीरमधील महत्त्वाचे पर्यटनस्थळ असलेल्या श्रीनगर येथे महाराष्ट्र पर्यटन निवास उभारण्याची घोषणा असो किंवा विविध महापुरुषांच्या नावे जाहीर करण्यात आलेल्या अनेक योजना असोत, गेल्या काही दिवसांच्या कालावधीमध्ये ज्या विषयांची चर्चा होत होती किंवा याबाबतचे निर्णय घेण्याची अपेक्षा व्यक्त होत होती त्याच निर्णयांवर शिक्कामोर्तब करण्याचे काम या अंतरिम अर्थसंकल्पाने केले आहे. उत्पन्नाचे नवीन स्रोत निर्माण करण्यासाठी येत्या काही कालावधीमध्ये सरकारला विविध उपायांची योजना करावीच लागणार आहे. अर्थात, संपूर्ण अर्थसंकल्प जेव्हा सादर केला जाईल तेव्हा सरकार उत्पन्न वाढवण्यासाठी कोणते निर्णय घेते हे समोर येईलच. पण केवळ निधीच्या अभावी एखादी चांगली योजना मागे पडावी असे वाटत नसेल तर सरकारला या सर्व योजना प्रत्यक्ष आणण्यासाठी निधीबाबतही गांभीर्याने विचार करावा लागणार आहे. विविध योजनांची घोषणा करून सरकारने खर्चाचे नियोजन समोर ठेवले असेल तर आगामी कालावधीमध्ये या खर्चाचा मेळ साधण्यासाठी उत्पन्न कसे मिळवायचे याचाही विचार सरकारला करावा लागणार आहे. विविध योजनांसाठी आर्थिक पाठबळ नसेल तर ते सरकारला निर्माण करावे लागणार आहे, याचाही विचार व्हावा.

# आद्य क्रांतीगुरू लहुजी वस्ताद साळवे यांच्या स्मारकाचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते भूमिपूजन

## आद्य क्रांतीगुरू लहुजी वस्ताद साळवे यांचे स्मारक तरुण पिढीला ऊर्जा देणारे ठरेल : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

पुणे : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आद्य क्रांतीगुरू लहुजी वस्ताद साळवे यांच्या स्मारकाचे आणि उरळी देवाची येथील नगर रचना परियोजनेअंतर्गत विकासकामांचे भूमिपूजन करण्यात आले. स्वातंत्र्य लढ्यामध्ये महत्वाचे योगदान देणाऱ्या आद्य क्रांतीगुरू लहुजी वस्ताद साळवे यांचे स्मारक तरुण पिढीला ऊर्जा देणारे ठरेल, असे प्रतिपादन यावेळी मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी केले.

संगमवाडी परिसरात आयोजित या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील आदी उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचा वारसा पुढे नेणाऱ्या आद्य क्रांतीगुरू लहुजी वस्ताद साळवे यांचे भव्य स्मारक उभारले जात असल्याबद्दल आनंद व्यक्त करून मुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले, क्रांतीगुरू लहुजी वस्ताद यांच्या आदर्शानुसार चालणारे सरकार असल्याने सर्वसामान्यांसाठी अनेक प्रकल्पांचे उद्घाटन आज करण्यात आले आहे. मातंग समाज प्रामाणिक आणि कष्टाळू आहे, दिलेला शब्द पाळणारा आहे. बार्टीच्या धर्तीवर अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्थेची (आर्टी) स्थापना करून सर्वसामान्य माणसाला न्याय देण्याचे कार्य केले आहे. त्यामुळे मातंग समाजातील मुलांना आता उच्च शिक्षण घेता येईल. स्पर्धेच्या युगात या समाजाला इतर समाजाच्या बरोबर विकासात सहभागी करून घेण्यासाठी शासन कटिबद्ध आहे.शासनाने नुकत्याच सादर केलेल्या अर्थसंकल्पात गड किल्ले, महापुरुषांच्या स्मारकासाठी तरतूद ठेवली आहे. नव्या पिढीला महापुरुषांच्या कार्य, बलिदानापासून प्रेरणा मिळावी यासाठी स्मारके उभारण्यात येत आहेत. भिडेवाडा येथे देखील सावित्रीबाई फुले यांचे स्मारक होत आहे. लहुजी वस्ताद यांच्या हातातील दांडपट्ट्याला शासनाने राज्य शस्त्राचा दर्जा दिला आहे. आद्य क्रांतीगुरू लहुजी वस्ताद साळवे यांच्या स्मारकाच्या माध्यमातून मातंग समाजातील नव्या पिढीला प्रेरणा मिळण्यासोबत उच्च पदावर जाता येईल, असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला.



आद्य क्रांतीगुरू लहुजी वस्ताद साळवे यांनी क्रांतीची ज्योत हजारो मनात पेटवली असे सांगून उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, आज छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य वाढविणाऱ्या छत्रपती संभाजी महाराज यांच्या स्मारकाच्या भूमीपूजनानंतर छत्रपतींच्या मावळ्याच्या स्मारकाचे भूमिपूजन होत आहे याचा आनंद आहे. क्रांतीगुरू लहुजी वस्ताद यांनी शस्त्राने पारंगत वीर तयार करण्यासाठी देशातील शस्त्राचे प्रशिक्षण देणारी पहिली शाळा काढली म्हणून त्यांना आद्य क्रांतीगुरू म्हटले जाते. आद्य क्रांतीगुरू लहुजी वस्ताद यांनी क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके, लोकमान्य टिळक, महात्मा ज्योतिबा फुले यांना प्रशिक्षण दिले. समाजातील विषमता दूर करण्याचे कार्य करणाऱ्या महात्मा फुले यांच्या पाठीशी ते भक्कमपणे उभे राहिले. १८५७ च्या स्वातंत्र्य समरात लहुजी वस्ताद साळवे यांनी प्रशिक्षित केलेले क्रांतिकारक लढत होते. देह ठेवण्यापर्यंत त्यांनी देशाची सेवा केली. अशा थोर क्रांतिकारकाचे स्मारक रूपाने स्मरण करणे आवश्यक आहे. ही प्रेरणा सर्वांपर्यंत पोहोचविण्यासाठी स्मारक उभारण्यात येत आहे. आता आर्टीची स्थापना करण्यासोबत आरक्षणात होणारा अन्याय दूर करण्यासाठी शासनाने समिती स्थापन केली आहे. येत्या काळात चिरागनगर मध्ये लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे स्मारक उभारण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

उपमुख्यमंत्री श्री.पवार म्हणाले, आद्य क्रांतीगुरू लहुजी वस्ताद साळवे यांच्या स्मारकासाठी अनेकांनी प्रयत्न केले. बहुजन समाजातून आलेल्या आणि आपल्या कर्तृत्वाने समाजाला दिशा देणाऱ्यांमध्ये लहुजी वस्ताद साळवे यांचे कार्य मोठे आहे. लहुजी वस्ताद साळवे यांचे घराणे पराक्रमी घराणे म्हणून प्रसिद्ध होते. लहुजी वस्ताद साळवे यांनी ही परंपरा राखत इंग्रजी सत्तेला आव्हान देण्याचे कार्य केले आणि तरुणांना शस्त्रास्त्रांचे प्रशिक्षण दिले. इंग्रजी सत्तेला उलथवून टाकण्यासाठी तरुणांच्या मनात विद्रोहाची ज्योत पेटवली. अशा थोर पुरुषाचे त्यांच्या कार्याला साजेसे स्मारक उभे राहणार आहे. पुढच्या पिढीला अभिमान वाटेल असे स्मारक उभारण्यात येईल.

लहुजी वस्तादांच्या कार्याची आठवण ठेवत तरुणांनी त्यांचा विचार स्विकारावा, स्मारक विचाराचे केंद्र असतात. तरुणांनी महापुरुषांपासून चांगला विचार घ्यायला हवा. व्यायाम, शिस्त, सचोटी आणि शिक्षणाने मेंदू बळकट करीत अन्यायाविरुद्ध लढण्याची तयारी ठेवावी. क्रांतीवीर लहुजी वस्तादांसारख्यांच्या कार्यातून महाराष्ट्र उभा राहीला आहे. स्मारकाच्या रूपाने त्यांच्या कार्याचा ठेवा जपला जाईल, येणाऱ्या पिढ्यांना त्यातून प्रेरणा मिळत राहील. मातंग समाजाच्या कल्याणासाठी आर्टीसाठी तातडीने पाऊले उचलले जातील, अशी ग्वाही त्यांनी दिली. उरुळी देवाची नगर रचना परियोजनेद्वारे ५-६ एकरात गरिबांसाठी घरे मिळतील,असेही ते म्हणाले.

मंत्री श्री.पाटील म्हणाले,आद्य क्रांतीगुरू लहुजी वस्ताद साळवे यांच्या स्मारकाची २० वर्षाची प्रतीक्षा पूर्ण झाली आहे. येत्या दोन वर्षात निधीची कोणतीही कमतरता पडू न देता स्मारकाचे काम पूर्ण करण्यात येईल. स्मारक पूर्ण झाल्यावर लहुजी वस्ताद साळवे यांचे कार्य लक्षात घेऊन उपक्रम राबवावेत. नुकतेच अंदाजपत्रकात आर्टीची घोषणा करण्यात आली आहे, त्यामुळे मातंग समाजाच्या प्रगतीला गती मिळेल. समाजातील सुशिक्षित व्यक्तींनी शासनाच्या योजना शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचवाव्यात, असे आवाहन त्यांनी केले.आमदार सुनील कांबळे आणि स्मारक समितीचे अध्यक्ष अशोक लोखंडे यांनीही यावेळी विचार व्यक्त केले.

प्रास्ताविक पुणे मनपा आयुक्त विक्रम कुमार यांनी केले. स्मारकासाठी साडेपाच एकर जागा आरक्षित करण्यात आली असून या कामावर ११५ कोटी रुपये खर्च होणार आहे. त्यात संग्रहालय, आर्ट गॅलरी, वसतिगृह, वाचनालय, विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण हॉल आदी सुविधा असतील. परिसरात आद्य क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे यांचा ३५ फूट उंचीचा पुतळा उभारण्यात येणार आहे. याशिवाय नगर नियोजन योजनेअंतर्गत उरुळी देवाची येथे विकासकामे करण्यात येणार आहे, असे त्यांनी सांगितले.कार्यक्रमाला आमदार माधुरी मिसाळ, सुनील कांबळे, भीमराव तापकीर, सिद्धार्थ शिरोळे, चेतन तुपे, सुनील टिंगरे, विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार, क्रीडा आयुक्त डॉ. राजेश देशमुख, जिल्हाधिकारी डॉ.सुहास दिवसे, मनपा अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे, माजी महापौर मुरलीधर मोहोळ आदी उपस्थित होते.

पान १ वरुन

### भव्य 'नमो महारोजगार मेळाव्या..

जवळपास १० लाख युवकांना नोकऱ्या देण्याचे लक्ष्य ठेवले आहे. राज्य शासनही यात कुठेही कमी पडणार नाही. प्रधानमंत्री कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत १ कोटी ४० लाख विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जात आहे. नवीन शिक्षण धोरणामधील अभ्यासक्रमातही कौशल्य विकास अभ्यासक्रमांचा समावेश करण्यात आला आहे. याशिवाय मुख्यमंत्री स्वयंरोजगार योजनेतून रोजगार देणारे हात निर्माण करण्याचाही शासनाचा प्रयत्न असल्याचे ते म्हणाले. गेल्या दोन वर्षात दाओस येथे जवळपास ५ लाख कोटींचे सामंजस्य करार झाले असून यातून ४ ते ५ लाख रोजगार निर्माण होणार आहेत.

**बारामती–विकासाचे मॉडल** पोलीस हा कायदा व सुव्यवस्था राखण्याचे काम करत असताना सणवार, उत्सव, आंदोलने आदी कालावधीत ऊन, पाऊस वाऱ्यामध्ये रस्त्यावर उभा असतो. म्हणून त्यांच्याकडून चांगल्या कामाची अपेक्षा करत असताना त्यांना दर्जेदार सुविधाही दिल्या पाहिजेत. त्या बारामतीतील या पोलीस वसाहतीत दिल्या आहेत. राज्यातील सर्व बसस्थानके सर्व सोई सुविधायुक्त अशी सुसज्ज 'बसपोर्ट' करून प्रवाशांना सर्व सोई सुविधा देण्याचा शासनाचा प्रयत्न असून बारामतीमध्ये राज्यातील पहिले मॉडेल बसस्थानक झाले आहे.

**राज्यातील शासकीय इमारती बांधताना बारामतीच्या इमारती समोर ठेवणार– देवेंद्र फडणवीस**

बारामतीचे बस स्थानक एखाद्या विमानतळासारखे वाटावे असे आहे, तसेच येथील पोलीस ठाणे, पोलीस उपमुख्यालय, पोलीसाकरीता इमारती या सरकारी बांधकामासारखे न दिसता या एखाद्या कॉर्पोरेट कंपनीच्या कार्यालयासारखे वाटते. अतिशय सुंदर इमारती झाल्या असून बारामतीच्या वैभवात भर घालणाऱ्या वास्तूचे आज उद्घाटन करण्यात आले आहे. राज्यात इमारती बांधण्यासाठी या इमारतीचा आधार घेण्यात येईल, अशा शब्दात उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी बारामतीतील विकासकामांचे कौतुक केले.शासकीय कार्यालये चांगली असली पाहिजेत आणि अधिकाऱ्यांमध्येही लोकाभिमुखता असली पाहिजे. अशा कार्यालयात अधिकारी व कर्मचारी चांगले काम करुन नागरिकांच्या तक्रारी दूर करण्याचे काम करतील, अशी विश्र्वास उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी व्यक्त केला.

ते पुढे म्हणाले, एकीकडे उद्योगांना मनुष्यबळाची असलेली आवश्यकता लक्षात घेऊन आणि विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध करुन देण्याची गरज लक्षात घेऊन 'नमो महारोजगार मेळाव्या'चे आयोजन निर्णय घेण्यात आला आहे. मेळाव्याच्या माध्यमातून तरुणांना मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी मिळणार असून त्यांच्या हाताला काम देण्याचा हा उपक्रम आहे. रोजगार मेळाव्यात रोजगार मिळालेल्या उमेदवारांनी चांगले काम करावे. नागपूर येथे आयोजित पहिल्या नमो महारोजगार मेळाव्यात ११ हजार तरुणाला रोजगार मिळाले असून त्यापैकी काहींना ५० लाखापर्यंत पॅकेज मिळाले आहेत. मोठ्या प्रमाणात उच्च वेतनाच्या नोकरीपासून ते दहावी शिक्षण घेतलेल्या तरुणाला रोजगार मिळाले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पुढाकाराने पश्र्िचम महाराष्ट्राचा नमो महारोजगार बारामती येथे आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यात ५५ हजार पेक्षा अधिक पदे अधिसूचित करण्यात आली असून ३६ हजार अर्ज प्राप्त झाले आहेत. उद्यापर्यंत आणखीन अर्ज येतील. या रोजगार मेळाव्यात उमेदवारांना त्यांच्या कौशल्याप्रमाणे रोजगार मिळेल, असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताची अर्थव्यवस्था १० व्या स्थानावरुन ५ व्या स्थानी आणली गेली असून येत्या तीन ते चार वर्षात काळात जगातील तिसऱ्या अर्थव्यवस्था करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. याकरीता प्रशिक्षित मनुष्यबळाचे महत्व लक्षात घेऊन अर्थसंकल्पात राज्यात दोन हजार प्रमोद महाजन कौशल्य विकास केंद्र उघडण्याचे जाहीर केले आहे. या माध्यमातून तरूणांना कौशल्य प्रशिक्षणाचे कार्यक्रम राज्य सरकारने हाती घेतले आहे, असेही श्री.फडणवीस म्हणाले.

**बारामती तालुका राज्यात पहिल्या क्रमांकावर आणण्यासाठी प्रयत्न करणार–अजित पवार**

उपमुख्यमंत्री श्री.पवार म्हणाले, बारामतीच्या वैभवात भर घालणाऱ्या चार सुंदर इमारतींचे आज लोकार्पण करण्यात आले. पोलीस उप मुख्यालयाच्या इमारतीसाठी १३२ कोटी रुपये, पोलीस वसाहत साठी ७५ कोटी रुपयांचा खर्च आला. बारामतीचे नूतन बस स्थानक महाराष्ट्रातील क्रमांक एकचे बस स्थानक आहे. खूप चांगल्या दर्जाची कामे झाली आहेत. विविध विकास कामांसाठी निधीची देखील कमतरता कमी पडू दिली जाणार नाही.

पोलीस विभागाला पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. आज ३९ वाहनांचा लोकार्पण सोहळा पार पडला त्यात १४ महिला वाहन चालक आहेत. महिलांना देखील संधी प्राप्त करून दिली जात आहे. महाराष्ट्रात बारामती हा क्रमांक एकचा तालुका येण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.राज्याने जर्मनीबरोबर एक करार केला असून त्यांना ५ लाख कुशल मनुष्यबळाची आवश्यकता आहे. त्यासाठी मनुष्यबळ कौशल्य प्राप्त करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. आजच्या रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून अधिकाधिक उमेदवारांना रोजगार मिळवा यासाठी प्रयत्न सुरू आहेत. कृषीमूल शिक्षण संस्था आयटीआय तसेच मालेगाव येथील शासकीय आयटीआय येथे विविध १५ ते ३० दिवसांचे कौशल्य विकास अभ्यासक्रम राबविण्यात येणार असून विद्यार्थ्यांना त्यातून रोजगार मिळू शकणार आहेत, असेही उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले.

**बेरोजगार तरुणांना रोजगार देण्यासाठी कौशल्य विभाग कटिबद्ध–मंगल प्रभात लोढा**

श्री. लोढा म्हणाले, महाराष्ट्रात प्रथम नागपूर येथे रोजगार मेळाव्याचे आयोजन केले होते. त्या रोजगार मेळाव्यात चांगला प्रतिसाद मिळाला. बारामती येथील रोजगार मेळाव्यात उद्योजकांनी ५५ हजार ५५७ रिक्तपदे अधिसूचित केली आहेत. याठिकाणी २५४ उद्योजकांनी सहभाग घेतला असून ३८ हजार ७४४ उमेदवारांनी नोंदणी केली आहे. याव्यतिरिक्त ऑनलाईन नोंदणी देखील मोठ्या प्रमाणात झाली आहे. या वर्षीच्या अर्थसंकल्पात कौशल्य विभागासाठी भरीव तरतूद केली आहे. त्याच्या माध्यमातून राज्यातील १ हजार महाविद्यालयात नोकरीच्या दृष्टीने ३ महिन्याचे कौशल्य विकासाचे कोर्स सुरू करण्यात येतील. राज्यातील बेरोजगार तरुणांना जो पर्यंत रोजगार मिळत नाही तो पर्यंत कौशल्य विभाग विविध प्रशिक्षणाच्या माध्यमातून नोकरी देण्यासाठी प्रयत्नशील राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या आयुक्त निधी चौधरी म्हणाल्या, विभागाच्यावतीने युवक युवतींच्या पंखांना बळ देण्याचे काम करतो. २ हजार ठिकाणी प्रमोद महाराज कौशल्य विकास केंद्र उभारण्यात येणार असून सहा ठिकाणी आंतरराष्ट्रीय कौशल्य विकास केंद्रांची उभारणी करत आहोत. पहिला नमो महारोजगर मेळावा १० डिसेंबर का नागपूर केला होता त्याची फलश्रुती पाहून ३ महसुली विभागात आयोजित मेळाव्यात ४० हजार मुलांना रोजगार देण्यात आले, अशी माहिती त्यांनी दिली.

ज्येष्ठ नेते श्री. पवार म्हणाले, विद्यार्थ्यां रोजगाराची गरज लक्षात घेऊन राज्यात नमो महारोजगार मेळाव्याच्या माध्यमातून राज्य शासन प्रयत्न करीत आहे. विद्या प्रतिष्ठानच्या माध्यमातूनही गेल्या ३ वर्षात सुमारे २ हजार ५०० विद्यार्थ्यांना नामांकित कंपन्यात रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. कार्यक्रमाला विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे महाव्यवस्थापक मनोज कुसेकर, विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार, क्रीडा आयुक्त डॉ. राजेश देशमुख, जिल्हाधिकारी डॉ.सुहास दिवसे, पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश चव्हाण आदी उपस्थित होते.

### मोदी सरकारकडून पहिल्या यादीत..

मतदारसंघातून निवडणुकीच्या मैदानात उतरणार आहेत. तर अमित शाह यांना गांधीनगरमधून उमेदवारी घोषित करण्यात आली. दरम्यान, असे असले तरी नितीन गडकरी यांना पहिल्या यादीत स्थान दिले नसल्याने चर्चांना उधाण आले आहे. त्यांना दुसऱ्या यादीत उमेदवारी घोषित करण्यात येणार का? किंवा भाजपचे यामागे काही धक्कातंत्र आहे? यावर राजकीय वर्तुळात चर्चा रंगल्या आहेत.

### मुख्यमंत्र्यांच्या बालेकिल्ल्यात राहुल..

उद्धव बाळासाहेब ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष आणि काँग्रेस या महायुतीच्या नेत्यांकडून जिल्ह्यावर लक्ष्य केंद्रीत केले असून त्यापाठोपाठ आता काँग्रेस नेते राहुल गांधी यांची भारत जोडो न्याय यात्रा आता जिल्ह्यातील भिवंडी आणि ठाणे शहरातून जाणार आहे. राहुल गांधी यांनी संपूर्ण देशात भारत जोडो यात्रा सुरु केली आहे. पहिल्या टप्प्यातील या यात्रेला चांगला प्रतिसाद मिळाल्यानंतर त्यांनी आता दुसऱ्या टप्प्यात ही यात्रा पुन्हा सुरु केली आहे. या यात्रेचे नियोजन आणि कार्यक्रमांची आखणी करण्यासंदर्भात काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी शनिवारी ठाणे काँग्रेस मुख्यालयात बैठक घेऊन पदाधिकारी व कार्यकर्त्यांना महत्वाच्या सुचना केल्या. यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधून यात्रेबाबत माहिती दिली.

ही यात्रा १२ मार्चला गुजरातमधून राज्यातील नंदुरबार जिल्ह्यात प्रवेश करणार आहे. त्यानंतर धुळे, मालेगाव, नाशिक मार्गे ती १५ मार्चला वाडा, भिवंडी येथे येणार आहे. या दिवशी ते भिवंडीत थांबणार आहेत. १६ मार्चला ही यात्रा ठाणे शहरात येणार आहे. या यात्रेदरम्यान राहुल गांधी यांची सभा होणार आहे. यानंतर हि यात्रा मुलूंड येथे थांबेल आणि १७ मार्चला दादर चैत्यभूमी येथे यात्रेचा समारोप होईल. याचदिवशी ते मुंबईतील महाविकास आघाडीच्या बैठकीला उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती बाळासाहेब थोरात यांनी दिली. भिवंडी येथून मुंबई-नाशिक महामार्गे भारत जोडो न्याय यात्रा खारेगाव मार्गे मुंब्रा-कौसा, कळवा, कोर्टनाका, जांभळीनाका, राम मारुती रोड, गोखले रोड, तीन हात नाका येथून मुलूंडला जाईल. जांभळी नाका येथे राहुल गांधी हे यात्रेच्या वाहनांवरूनच सभा घेऊन उपस्थितांशी संवाद साधणार आहेत.

### आसारामची शिक्षा कायम; ..

सुनावणी करण्याचे निर्देश दिले.वकील राजेश गुलाब इनामदार यांनी आसारामच्या वतीने याचिका दाखल केली आहे. आसारामने या खटल्यात ११ वर्षे ७ महिन्यांहून अधिक काळ शिक्षा भोगल्याचे त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणले. आसारामला हृदयविकार, अति थायरॉईड, आतडे व जठरात रक्तस्रावासह अशक्तपणा, सौम्य प्रोस्टेटिक हायपरप्लासिया आणि मधुमेह, उच्च रक्तदाब, कोविड-न्यूमोनिया आणि यूरोसेप्सिस यासह अनेक आजारांनी ग्रस्त आहे. त्याच्या हृदयाला ऑक्सिजनयुक्त रक्तपुरवठा कमी होत आहे. त्याची प्रकृती दिवसेंदिवस बिघडत चालली आहे. त्याचा तुरुंगातच वेदनादायी मृत्यू होण्याची भीती आहे, असे याचिकेत म्हटले होते.

### राहुल गांधींचा देश तोडण्याचा डाव;

अशोक चव्हाण यांनी नुकताच भाजपात प्रवेश केला. आसामसह अन्य राज्यातील काँग्रेस व अन्य पक्षातील लोकप्रतिनिधी व नेते मोठ्या प्रमाणात भाजपात प्रवेश करीत आहेत. या पार्श्र्वभूमीवर काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी देश जोडण्याऐवजी स्वत:चा पक्ष जोडण्याचे काम करण्यात त्यांचा फायदा होणार असल्याचे आठवले म्हणाले.केंद्र सरकारच्या कामगिरीमुळे देश गतीने पुढे जात आहे. परिणामी सध्या राष्ट्रीय लोकशाही आघाडीला (एनडीए) चांगला प्रतिसाद असल्याचा विश्र्वास देताना, काँग्रेसच्या सत्ताकाळात मात्र, देशाचा विकास गतीने झाला नाही अशी टीका आठवले यांनी केली.नरेंद मोदी पंतप्रधान झाल्यावर अनेक चांगल्या गोष्टी झाल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जिथे संविधान लिहिले त्या ठिकाणी त्यांचे दीडशे कोटींचे स्मारक उभारण्याचे काम केले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

## २४७ मोहोळ (आ.जा.) विधानसभा मतदारसंघातील भटक्या विमुक्त जाती मातीतील नागरिकांना मतदार ओळखपत्रासाठी शिबिर संपन्न



पंढरपूर /राजेंद्र कोरके पाटील : मा भारत निवडणूक आयोग मा मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य मा जिल्हाधिकारी सोलापूर त्यांच्याकडील निर्देशानुसार०५/३/२०२४ रोजी २४७ मोहळ आ. या मतदारसंघातील भटक्या विमुक्त जाती जमाती यांना ओळखपत्र व नवीन ओळखपत्र देण्यासाठी नागनाथ देवस्थान वडवळ येथे आयोजन केले होते २४७ मोहोळ अजा विधानसभा मतदारसंघातील भटक्या विमुक्त जाती जमाती नागरिकांची मतदान नोंदणी करण्यासाठी मस्त असणाऱ्या मौजे लांबोटी येथे. सावळेश्र्वर गोळेगाव यावली अनगर येथे असणाऱ्या ९ शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते तेथून एकूण एकशे अठ्ठावीस मतदारांनी नोंदणी करून घेतली होती राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी मा श्रीकांत देशपांडे यांनी यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात नागरिकांना ओळखपत्र वाटप व नवीन नोंदणी कार्यक्रमाची शिबिराचे आयोजन करण्यात आले होते

सदर कार्यक्रमास उपजिल्हा निवडणूक अधिकारी श्री गणेश नेहाळी काही मुक्त जाती जमातीचे प्रतिनिधी बाळकृष्ण रेणके उपविभागीय अधिकारी पंढरपूर सचिन इथापे उपविभागीय अधिकारी मोहोळ विभाग गोडसे तहसीलदार मोहोळ सचिन मुळीक जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयाचे परदेशी मत मोहोळ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री राऊत साहेब तहसीलदार सुधाकर धनंजय मटका जाती जमातीतील अधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांचे स्वागत समारंभ झाल्यानंतर प्रज्वलाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली त्यानंतर प्रास्ताविक उपविभागीय अधिकारी मा श्री सचिन इथापे यांनी निवडणूक अधिकारी नेहा व निवडणूक अधिकारी देशपांडे यांनी उपस्थिती त्यांना संबोधित केले

मुख्य निवडणूक अधिकारी यांच्यामार्फत काही त्या मतदारसंघातील मतदारांना ओळखपत्रे देण्यात आली श्री श्रीकांत देशपांडे यांनी आपल्या मनोगतामध्ये वंचित नागरिकांना संबोधित करताना म्हणाले की सरांनी लोकसभा व येणारी आता विधानसभा यामध्ये आपण मतदान करून आपले मतदानाचा हक्क बजावा असे सांगितले तहसीलदार सचिन मुळीक यांनी उपस्थित आमचे आभार मानून कार्यक्रम संपला असे जाहीर केले

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेश कोठेवाली सर कार्यक्रम व्यवस्थित पार पाडण्यासाठी मोहोळ मंडल अधिकारी व तलाठी मोहोळ साळुंखे व तसेच तलाठी वडवळ सरक शुभेच्छा अधिकारी व महसूल सहाय्यक अधिकारी वाघमोडे यांच्यासह तहसील कार्यालय ते कर्मचारी अधिकारी यांनी परिश्रम घेतले



वळसंग येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी उद्घाटन केलेल्या ऐतिहासिक विहीर व स्मारक सुशोभीकरण भूमिपूजन कार्यक्रमानिमित्त कार्यक्रमाचे संयोजक माजी नगरसेवक आनंद चंदनशिवे यांच्यासोबत दैनिक यश सिध्दी न्यूज संपादक कमलाकर सोनकांबळे, निजप्पा गायकवाड, धोंडूराज बनसोडे, गौतम बाळशंकर, आकाश माने, दत्ता कांबळे, इराणा दसाडे असलम मुल्ला यासह अनेक मान्यवर उपस्थित होते



वळसंग येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी उद्घाटन केलेल्या ऐतिहासिक विहीरीच्या ठिकाणी भेट देण्यात आले यावेळी दैनिक यश सिध्दी न्यूज संपादक कमलाकर सोनकांबळे, भाजपा अनु विभाग अक्कलकोट तालुकाध्यक्ष निजप्पा गायकवाड, धोंडूराज बनसोडे, गौतम बाळशंकर, आकाश माने, दत्ता कांबळे, इराणा दसाडे असलम मुल्ला यासह अनेक मान्यवर उपस्थित होते

## मराठवाड्यातील दुष्काळाच्या प्रश्नावर सेवा भावी संस्थांची मदत घेतली जाणार : डॉ गोऱ्हे

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : मराठवाड्यातील दुष्काळाच्या प्रश्नावर छोट्या मोठ्या संस्थांना घेऊन काम केल्यास आपणाता मदतच होईल आसे प्रतिपादन विधान परिषदेच्या उपाध्यक्षा



मा.डॉ.नीलमताई गोऱ्हे यांनी एनजीओ व प्रशासनाची संयुक्त आढावा बैठक घेतली त्या वेळेस त्या बोलत होत्या .

छ.संभाजीनगर येथे दिनांक २४ फेब्रुवारी रोजी छ. संभाजीनगर येथे जिल्हाधिकारी कार्यालयात त सुभेदारी गेस्ट हाऊस मध्ये महाराष्ट्र राज्याच्या विधान परिषदेच्या उपसभापती मा.डॉ.नीलमताई गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली तसेच छत्रपती संभाजी नगरचे जिल्हाधिकारी श्री स्वामी साहेब यांच्या उपस्थितीत व दुष्काळ निवारण मंचचे स्वयंसेवी संस्थांचे पदाधिकारी ,पत्रकार यांचे उपस्थितीत. मराठवाड्यातील दुष्काळाच्या प्रश्नावरती आढावा बैठक संपन्न झाली .यावेळी स्वयंसेवी संस्थांच्या वतीने श्री रमेश भिसे यांनी मराठवाड्यातील दुष्काळाच्या संदर्भात एनजीओ ना जिल्हा स्तरावर व तालुका स्तरावर शासनाने उपाय योजना करण्याच्या साठी सोबत घेवून काम केल्यास दुष्काळ निवारण करण्यासाठी जनतेला मदतच होईल याची माहिती दिली व दुष्काळासंदर्भातील १८ मागण्या. वाचून दाखवल्या व सदर चे निवेदन सर्व स्वयंसेवी संस्थांच्या वतीने मा.डॉ.नीलमताई गोऱ्हे तसेच जिल्हाधिकारी श्री स्वामी साहेब यांना सुपूर्त केले. यावेळी जिल्हाधिकारी स्वामी साहेबांनी छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यात दुष्काळाच्या संदर्भात रोजगार. पाणी या विषयी कामाचा आढावा मांडला तसेच ग्रामीण भागात पिण्यासाठी फक्त दहा ते बारा टक्केच पाणीसाठा शिल्लक असल्याने त्यांनी चिंता व्यक्त केली .


यावेळी मराठवाड्यात दुष्काळाची तीव्रता वाढत आहे.पिण्याच्या पाण्यासाठी तसेच रोजगार व जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न, पाण्याचा प्रश्न अतिशय गंभीर बनणार असल्याचे दिसत आहे.

त्यामुळे शासन ,प्रशासन, स्वयंसेवी संस्था यांनी एकत्रितपणे मोठ्या प्रमाणात लोकांसाठी दुष्काळाच्या निवारणार्थ काम करण्याची गरज असल्याचे सर्वानुमते ठरले. नंतर पत्रकार परिषद होऊन दुष्काळा संदर्भात करण्यात येणाऱ्या उपाय योजनांची ,कामाची मांडणी मा. डॉ .नीलमताई गोऱ्हे यांनी केली. सदर बैठकीसाठी मराठवाड्यातील दुष्काळ निवारण मंच (एमडीआरएसपी) स्वयंसेवी संस्थांचे श्री रमेश भिसे ,पुष्कराज तायडे एच.पी. देशमुख धनाजी धोतरकर, रमेश कुटे, मारुती बनसोडे ,विजय भिसे हे उपस्थित होते

## टाकळीवाडी चे सुपुत्र विजय श्रीपाल बदामे यांची सुभेदार मेजरपदी निवड

पत्रकार नामदेव निर्मळे

टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील विजय बदामे हे १९९६ यावर्षी भरती झाले. त्यांचे ट्रेनिंग बेंगलोर या ठिकाणी झाले. त्यांनी आतापर्यंत भारतीय सेना मध्ये आपली सेवा जम्मू, चंदिगड, डेहराडून, कुपवाडा, दिल्ली, मुंबई, अरुणाचल प्रदेश, गया (बिहार), सिमला, सियाचीन, या ठिकाणी आपली सेवा बजावलेली आहे. सध्या ते पुणे येथे कार्यरत आहेत. आतापर्यंत त्यांची सेवा २७वर्षे पूर्ण झालेली आहे.यांचे शिक्षण टाकळीवाडी येथील प्राथमिक शाळेत झाले. तसेच पद्माराजे हायस्कूल शिरोळ येथे पूर्ण झाले. अतिशय जिद्दीने हे भारतीय सेना मध्ये भरती झाले. आहेत यांचे बंधू सुद्धा नुकतेच नायक या पदावरून सेवानिवृत्त झाले आहेत. आपल्या भावाच्या पावलावर पाऊल टाकत यांनी सुभेदार मेजर पद मिळवले. गावामध्ये यांचे कौतुक व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



## आगामी निवडणुकीत महायुतीला विजयी करण्याचा रिपब्लिकन पक्षाचा संकल्प

### – केंद्रीय राज्यमंत्री ना.रामदास आठवले

मुंबई : रिपब्लिकन पक्ष हा राष्ट्रीय स्तरावर एन.डी.ए.चा आणि महाराष्ट्रात महायुतीचा अविभाज्य घटक पक्ष आहे.आगामी लोकसभा निवडूणुकीत महाराष्ट्रात महायुतीचे ४५ खासदार निवडुन आणण्याचा रिपब्लिकन पक्षाचा संकल्प आहे.आगामी काळातील लोकसभा आणि विधानसभा निवडणूकीत महायुतीला प्रचंड बहुमताने विजयी करण्याचा संकल्प रिपब्लिकन कार्यकर्त्यांनीकरावा असे आवाहन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी केले.





चेंबुर येथील चंदन लॉन येथे रिपब्लिकन पक्षाचा दक्षिण मध्य मुंबईच्या वतीने आयोजित संकल्प मेळाव्यात ना.रामदास आठवले बोलत होते. यावेळी विचार मंचावर संकल्प मेळाव्याचे सभाअध्यक्ष, आयोजक,रिपाइं चे दक्षिण मध्य मुंबई जिल्हाध्यक्ष संजय डोळसे उपस्थित होते.तसेच रिपाइंचे राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश महातेकर,राज्य सरचिटणीस गौतम सोनावने,मुंबई अध्यक्ष सिध्दार्थ कासारे,फुलाबाई सोनावने,अभया सोनावने,उषा रामलु,कामु पवार,स्वामी वैदु,महादेव साळवे,बाळासहेब बनसोडे,साहेबराव ससाणे,अनिस पठाण,सुभाष साळवे,रवि गायकवाड,नंदु साठे,शंकर साठे,महेंद्र पाटील,वैशाली जगताप, एम.एस.नंदा,सचिन मोहिते,रमेश गायकवाड,भाजप नेते विठ्ठल खरडमोल आदि अनेक मान्यवर उपस्थित होते. रिपब्लिकन पक्ष देशभर वाढत आहे.महाराष्ट्र आणि मुंबईत रिपाइंचा बालेकिल्ला आहे.१९९२ च्या महापालिका निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाचे १२ नगरसेवक निवडुन आले होते.रिपाइं ला महापौर पद ही त्यावेळी मिळाले होते.या इतिहासाची पुनरावृत्ती करण्यासाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागावे. आगामी मुंबई महापालिका निवडणुकीत भाजप महायुतीमधुन २५ जागा लढवण्याची तयारी रिपब्लिकन पक्ष करित आहे.त्यातुन किमान १५ जागा तरी निवडुन आणण्याचा आणि मुंबईचे उपमहापौरपद मिळविण्यचा रिपाइंचा संकल्प आहे. त्यासाठी रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी आपआपल्या भागात कामाला लागावे.जनतेत मिसळून जनतेचे प्रश्र्न सोडवण्याकडे लक्ष द्यावे.असे आवाहन ना.रामदास आठवले यांनी केले.

रिपाइं च्या या संकल्प मेळाव्यास महायुतीमधील भाजप आणि शिवसेने च्या नेत्यांना मुख्यमंत्री; उपमुख्यमंत्री; आणि स्थानिक खासदार राहुल शेवाळे; भाजप मुंबई अध्यक्ष आशिष शेलार आदींना निमंत्रित करण्यात आले होते.मात्र महायुतीमधील एकही नेता रिपाइं च्या संकल्प मेळाव्यास उपस्थित राहिले नसल्याची या मेळाव्यात मोठी चर्चा झाली. याबाबत रिपाइं नेत्यांनी नाराजी ही व्यक्त केली.

## कोसले गावातील शेतकऱ्याला शेतीनिष्ठ पुरस्कार जाहीर

ठाणे/मिलिंद जाधव : कल्याण ग्रामीण कोसले गावातील आदर्शवत शेतकरी श्रीराम विठ्ठल पालवी यांना सन २०२० चा शेतीनिष्ठ शेतकरी वसंतराव नाईक हा महाराष्ट्र शासनाचा शेतकरी पुरस्कार जाहीर झाला. शेतकऱ्याला दिला जाणारा मनाचा हा पुरस्कार प्रत्येक जिल्ह्यातून एका शेतकऱ्याला दिला जातो. पारंपारिक शेतीला बगल देऊन शेतीमध्ये आधुनिक नवनवीन तंत्रज्ञान विकसित करून अमुलाग्र बदल घडवून सेंद्रिय शेती विकसित केली आहे. पंचक्रोशीतील शेतकर्यांना एकत्रित करून सेंद्रिय खताच्या जोरावर शेतीमध्ये वेगवेगळे प्रयोग करून यशस्वीरीत्या त्यांनी ते पूर्ण केले आहेत. शेतीमध्ये विविध तंत्रशुद्ध नवीन यंत्र वापरून खताचा जास्त वापर न करून सेंद्रिय शेतीमध्ये त्याने आपला वेगळा ठसा उमटवला असून ठाणे जिल्ह्यात त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून त्यांना याअगोदरच आदर्शवत शेतकरी म्हणून ठाणे जिल्हा परिषदेने सन्मानित केले आहे. विविध संस्था पंचक्रोशीतील प्रतिष्ठित लोकांकडून त्यांना सन्मान व गौरव मिळाला आहे. तरुण पिढीने मोबाईलच्या विळख्यात न अडकता शेतीमध्ये काबाडकष्ट करून आपला उदरनिर्वाह स्वतः कसा केला पाहिजे याच मुर्तीमंद उदाहरण म्हणून श्रीराम पालवी यांच्याकडे आदर्श शेतकरी म्हणून पाहत आहे. जगाचा पोशिंदा हा शेतकरी आहे. तो जगला पाहिजे, भारत हा कृषिप्रधान देश असून प्रत्येक तरुणाने शेतीमध्ये नवनवीन तंत्रशुद्ध यंत्र वापरून आधुनिक शेती करून देशाला शेतीमध्ये सुजलाम सुफलाम बनविले पाहिजे. असे त्यांचे मत आहे. वेळोवेळी गावातील तरुणांना शेतीविषयी योग्य मार्गदर्शन करून त्यांची कार्यशाळा भरवित असतो. अश्या आदर्शवंत शेतकऱ्याचा प्रत्येकाने आदर्श घेऊन शेतीकडे वळले पाहिजे. या यशाच्या मागे त्यांची पत्नी सौ. सविता पालवी यांचे मोलाचे सहकार्य असून कुटुंबातील प्रत्येक सदस्य त्यांना वेळोवेळी शाबासकीची थाप देत असतात.



त्याचबरोबर दिपक कुटे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी तथा प्रकल्प संचालक आत्मा ठाणे, मनाली तांबडे, प्रकल्प उपसंचालक आत्मा, ठाणे रामेश्र्वर पाचे, कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे, कुमार जाधव, तालुका कृषि अधिकारी, कल्याण, शिंदे कृषी अधिकारी, संत, विस्तार अधिकारी, घोलप, जविर, भगवान पथारे, मंडळ कृषी अधिकारी, कल्याण, विजय पाटील, कृषि पर्यवेक्षक, वैशाली भापसे, तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक, कल्याण,प्रसाद भोकरे, कृषी सहाय्यक,कल्याण यांनी प्रत्यक्षात भेट देऊन त्यांचा सन्मान व सत्कार केला.

हा पुरस्कार मिळण्यामागे असंख्य शासनाच्या कर्मचार्यांनी त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करून त्यांना सहकार्य केले आहे. हा पुरस्कार जाहीर झाल्यानंतर त्यांचे सर्वच स्तरातून त्याच्यावर कौतुकाचा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## समूह शाळांसाठी राज्यभरातून ७०० प्रस्ताव;

पुणे : कमी पटसंख्येच्या शाळांच्या समायोजनातून समूह शाळा (क्लस्टर स्कूल) निर्माण करण्यासाठी राज्यभरातून सुमारे ७०० प्रस्ताव आले आहेत. त्यात साधारण १९०० शाळांचे समायोजन करून या समूह शाळा निर्माण करणे प्रस्तावित आहे. शिक्षण विभागाने राज्यातील शून्य ते २० विद्यार्थी पटसंख्येच्या शासकीय शाळांचे समायोजन करून नंदुरबार जिल्ह्यातील तोरणमाळ आणि पुणे जिल्ह्यातील पानशेत या समूह शाळांच्या धर्तीवर समूह शाळा निर्मितीचे प्रस्ताव शिक्षण उपसंचालक कार्यालयामार्फत मागवले होते. त्यासाठी शिक्षण विभागाने ३१ ऑक्टोबरची मुदत दिली होती. राज्यभरातील विविध जिल्ह्यांतून सुमारे ७०० प्रस्ताव आले आहेत.

साधारण १९०० शाळांचे समायोजन होणार आहे. प्रस्ताव येणे म्हणजे समायोजन होणे असे नसते. प्रस्तावांची योग्य छाननी करून अंतिम निर्णय घेतला जाणार आहे. बहुतांशी दुर्गम भागात आणि आदिवासी भागात समायोजन होणार नाही, अशी माहिती प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी दिली. कमी पटसंख्येच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या विकासात अडचणी येतात. मात्र, समूह शाळांचा फायदा विद्यार्थ्यांना एकूणच शैक्षणिक आणि सामाजिक विकासासाठी होणार आहे. समूह शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध केल्या जातील.

# काँग्रेस पक्षाचे बुथ मंडल सक्षम करा;

## महाराष्ट्राचे सह प्रभारी सोनल बेन पटेल



सोलापूर/प्रतिनिधीः अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या आदेशानुसार महाराष्ट्र काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नानाभाऊ पटोले, माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे व महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष आ.प्रणिती शिंदे तसेच सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हा अध्यक्ष डॉ.धवलसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे येथील काँग्रेस भवनात अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस तथा महाराष्ट्राचे सह प्रभारी सोनलबेन पटेल यांच्या उपस्थितीत सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या बैठक संपन्न झाली.

या बैठकीस संबोधित करताना पटेल यांनी सोलापूर जिल्ह्यातील माढा, सोलापूर, बार्शी या तीन लोकसभा मतदारसंघातील विधानसभानिहाय माहिती घेऊन काँग्रेस पक्षाचे संघटना मजबूत करण्यासाठी बुथ मंडल सक्षम करा अशी आवाहन केले. काँग्रेस पक्षाच्या बैठकीस गैरहजर राहणे अखिल भारतीय काँग्रेस कमिटी कडून वेळोवेळी आलेले आदेश पालन न केल्यास त्यांच्यावर कारवाईचे संकेत दिले आहेत. यापुढे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांवर जबाबदारी दिली जाणार असल्याची सुचित केले आहेत.

सोलापूर जिल्ह्यातील १६ ब्लॉक,५ शहरांची बुथ वाईज माहिती जिल्हा कार्याध्यक्ष विजयकुमार हत्तुरे यांनी दिली. लवकरच सोलापुरातील सोलापूर जिल्ह्यातील अकरा विधानसभा मतदारसंघात बैठकीचे आयोजन करण्यात येणार असल्याची हत्तुरे यांनी माहिती दिली.या प्रसंगी माजी आमदार धनाजी साठे वरिष्ठ उपाध्यक्ष भिमाशंकर जमादार,अशपाक बळोरगी, माढ्याचे नगराअध्यक्षा मिनल साठे, जिल्हा उपाध्यक्ष अण्णासाहेब इनामदार, दादा साठे,राधाकृष्ण पाटील, मल्लेशी बिडवे सर, राजकुमार पाटील,मुन्ना हरणमारे, जिल्हा संघटक रमेश हसापुरे, जिल्हा सरचिटणीस भिमराव बाळगे, भारत जाधव ,पंढरपूर तालुका अध्यक्ष हणमंत मोरे,उत्तर सोलापूर तालुका अध्यक्ष शालीवान माने, सांगोला तालुका अध्यक्ष अभिषेक कांबळे, पंढरपूर शहर अध्यक्ष अमर सुर्यवंशी, अक्कलकोटचे हडलगी, भटक्या विमुक्त सेलचे मोतीराम चव्हाण, निराधारसेलचे जिल्हाध्यक्ष सुरेश हावळे, श्रीशैल रणखांबे,अमोल म्हमाणे, मोहोळ अध्यक्ष किशोर पवार ,काकासाहेब बंडगर, सौदागर जाधव आदी उपस्थित होते.

# विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे फोटोग्राफर राहुल गोडसे यांचा राजधानी दिल्लीत सन्मान

## मेला मोमेंट्स फोटोग्राफी दिल्ली येथे आषाढी वारीतील पोटरेंट फोटोला त्रुटी क्रमांकाचे पारितोषिक मंदिर समितीतील तारा चमकला




पंढरपूर/प्रतिनिधीः केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालय व संचालक कला अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने मेला मोमेंट्स या राष्ट्रीय फोटोग्राफी स्पर्धेत मला वैभव महिन्यासाठी प्रथम पुरस्कार मिळाला स्टॉल या विषयात डिसेंबर महिन्यासाठी तृतीय पुरस्कार आणि मेला पोटरेंट या प्रकारात तिसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार श्रीमती मीनाक्षी लेखी परराष्ट्र व्यवहार व सांस्कृतिक मंत्री दिल्ली यांच्या हस्ते नॅशनल मॉडर्न गॅलरी दिल्ली येथे राहुल गोडसे यांना देण्यात आला. या सर्व विजेत्या म्हणून महान ते विजेते निवडण्यात आली त्यात आषाढी वारी येथे काढलेल्या फोटोला तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. ललित कला अकादमी (सांस्कृतिक मंत्रालय) २९ फेब्रुवारी २०२४ रोजी नॅशनल गॅलरी ऑफ मॉडर्न हार्ट निगमा नवी दिल्ली येथे मेला मोमेंट्स फोटोग्राफी स्पर्धेसाठी पुरस्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते ज्यात आकर्षण फोटोग्राफी द्वारे भारताचा दोन रामायण सांस्कृतिक वारसा साजरा केला गेला मेला मोमेंट्स फोटोग्राफी स्पर्धेला ११००० गुण अधिक प्रवेशिका मिळाल्या होत्या आजादी अमृत महोत्सव या थीम अंतर्गत भारतातील सण आणि परंपराचे सार अमर करण्यासाठी या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता

मेला मोमेंट्स हा सांस्कृतिक मंत्रालय चा एक उपक्रम आहे

जो आजादी का अमृत महोत्सव च्या अंतर्गत देशभक्तीतील मेळे लोकप्रिय करण्यासाठी कार्य करतो मानकी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या मन की बात दरम्यान घोषणा केली या मोहिमेचा उद्देश मेळाव्यांना भेट देऊन आगामी सणाच्या हंगामाचा उत्सव वाढवणे आहे. पूर्ण भारताला जोडणारा एक धागा आपल्या देशातील जत्रा आणि उत्सव ही एक विश्र्वसनीय सांस्कृतिक बाब आहे सणाचा हंगामात जत्रात हंगामानाचा समानार्थी म्हणून संपूर्ण देशभरात पूर्ण उत्साहाने सुरू झाला आहे आणि त्याचप्रमाणे त्यांच्याशी संबंधित पारंपारिक निळे देखील आहेत हे मिळेल किंवा मिळेल न मग ते आर्थिक असो सांस्कृतिक ग्रामीण असो किंवा शहरी केवळ भूतकाळाशी अतूट दुर्वाच देत नाहीत तरी या स्थानिक अर्थव्यवस्थेतला चालना देण्याचाही महत्वाची भूमिका बजावतात

मीनाक्षी लेखी सांस्कृतिक आणि परराष्ट्र व्यवहार राज्यमंत्री श्रीमती उमा नांदुरी सहसचिव सुसरी अमिता प्रसाद सर्वाई सहसचिव सांस्कृतिक आणि कलाकार मंत्रालय माध्यम प्रतिनिधी आणि छायाचित्रण प्रेमी सर्जनशीलता आणि सांस्कृतिक वारसा साजरा करण्यासाठी या मान्यवरांमध्ये सामील झाले होते राहुल गोडसे यांना तिसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळाल्याबद्दल श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके मंदिर समितीचे व्यवस्थापक बालाजी कुदलवाड व मंदिर समितीचे सर्व सदस्य अधिकारी कर्मचारी सहकारी यांनी गोडसे यांचे कौतुक करून त्यांचे अभिनंदन केले

# अक्कलकोट गट विकास अधिकारी सचिन खुडे यांचे सर्वत्र कौतुक

## स्वच्छता ही जीवनपद्धती म्हणून स्वीकारावी : विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार





पुणे : स्वच्छतेला जीवनामध्ये खूप महत्त्व असून संत गाडगेबाबांचा आदर्श समोर ठेवून प्रत्येकाने स्वच्छता जीवनपद्धती म्हणून अंगिकारावी, असे आवाहन विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी केले. विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित यशवंत पंचायत राज, संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान, अमृत महाआवास अभियान विभागस्तरीय पुरस्कार वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश चव्हाण, सातारच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, उपायुक्त रामचंद्र शिंदे, राहूल साकोरे, विकास मुळीक आदी उपस्थित होते.

डॉ. पुलकुंडवार म्हणाले, गाडगे महाराजांनी हजारो किलोमीटर पायी प्रवास करुन स्वच्छतेची चळवळ सुरु केली. त्या काळात त्यांनी स्वच्छतेचे महत्व गावोगावी पोहोचविले. आजही आरोग्याच्यादृष्टीने स्वच्छतेला तेवढेच महत्व आहे. म्हणून प्रत्येकाने परिसर स्वच्छतेला महत्त्व द्यावे. पुढील पिढीसाठी स्वच्छ, सुंदर वसुंधरा हवी असेल प्रत्येक ठिकाणी स्वच्छतेच्या सवयींचा अंगीकार करणे गरजेचे आहे. पर्यावरण प्रदूषण टाळण्यासाठी प्लास्टिकचा वापर करण्याचे आवाहन त्यांनी केले. ते पुढे म्हणाले, शाळांनी मुलांच्या स्वच्छतेबाबत विशेष लक्ष द्यावे. मुलांमध्ये पर्यावरणाविषयी जाणीव शिक्षणाच्या माध्यमातून निर्माण करणे गरजेचे आहे. पृथ्वीचे तापमान वाढल्याने अनेक धोके निर्माण होणार आहेत. हे धोके टाळण्यासाठी पर्यावरण जागृती आवश्यक आहे. गावातील स्वच्छता व नाविन्यपूर्ण कामे हे अभियानापुरते मर्यादित न ठेवता ती सातत्याने करावी, असे आवाहन त्यांनी केले. स्वच्छता अभियानामध्ये यशस्वी होण्यासाठी गावातील नेतृत्व खूप महत्वाचे आहे. शासनाच्या योजना राबविण्यासाठी शासकीय अधिकारी गावात येऊन पुढाकार घेत असेल तर गावकऱ्यांनीही सहभाग द्यावा असे सांगून श्री.चव्हाण यांनी पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन केले. श्रीमती नागराजन म्हणाल्या, घरकूल आणि स्वच्छता या मूलभूत सुविधा आहेत. पुरस्कार प्राप्त विजेत्यांपासून प्रेरणा घेऊन अन्य गावांनीही याचे अनुकरण करावे. सन्मानपूर्ण व निरोगी आयुष्य देण्यासाठी महाआवास व स्वच्छता अभियान खूप महत्त्वाचे आहेत. यावेळी विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या हस्ते पारितोषिक विजेत्या जिल्हा परिषद, पंचायत समित्यांचा ग्रामपंचायतींचा धनादेश, सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. तसेच उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकारी- कर्मचाऱ्यांचा गौरवही करण्यात आला. कार्यक्रमाला पुणे, सातारा, सोलापूर, कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील उपमुख्य कार्यकारी अधिकारी, गटविकास अधिकारी, ग्रामसेवक, सरपंच उपस्थित होते. संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियाना २०२०-२१ व २०२१-२२ एकत्रित स्पर्धेतील विजेत्या ग्रामपंचायती: बनवडी जि.सातारा-प्रथम, वाटंगी जि. कोल्हापूर व काळवाडी जि. पुणे विभागून द्वितीय, नांगोळे व खंबाळे जि. सांगली-तृतीय. अमृत महाआवास अभियान २०२२-२३ मधील प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण योजनेतील विजेते सर्वोत्कृष्ट जिल्हे: सातारा-प्रथम, सांगली-द्वितीय व कोल्हापूर-तृतीय. सर्वोत्कृष्ट तालुके- जावळी (सातारा)- प्रथम, कराड (सातारा)-द्वितीय व सातारा-तृतीय. सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायती- येळगाव व भुडकेवाडी (सातारा)- प्रथम, काठी ता.पाटण-द्वितीय, आचेगाव (सोलापूर)-तृतीय. शासकीय जागा उपलब्धतेबाबत सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे तालुके: कोरेगांव (सातारा)- प्रथम, सातारा- द्वितीय व कराड-तृतीय. वाळू उपलब्धतेबाबत सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे तालुके : पंढरपूर- प्रथम व पाटण-द्वितीय.

राज्य पुरस्कृत आवास योजनेचे विजेते सर्वोत्कृष्ट जिल्हे : सातारा-प्रथम, कोल्हापूर व पुणे द्वितीय विभागून, सांगली-तृतीय. सर्वोत्कृष्ट तालुके : महाबळेश्र्वर (सातारा)-प्रथम, खेड (पुणे)- द्वितीय व माण (सातारा)- तृतीय. सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत : बोंद्री (सातारा)- प्रथम, नागोळे (सांगली)- द्वितीय व गव्हांण (सांगली)- तृतीय. शासकीय जागा उपलब्धतेबाबत सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे तालुके: आंबेगाव (पुणे)-प्रथम, मंगळवेढा (सोलापूर)-द्वितीय व माढा(सोलापूर)- तृतीय. उपलब्धतेबाबत सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे तालुके : पंढरपूर- प्रथम व पाटण द्वितीय. यशवंत पंचायत राज अभियान २०२०-२१ राज्यस्तर : जिल्हा परिषद कोल्हापूर- प्रथम व पंचायत समिती कागल- द्वितीय.

विभागस्तर पुरस्कार २०२०-२१: पंचायत समिती कागल- प्रथम, पंचायत समिती गडहिंग्लज- द्वितीय, पंचायत समिती माढा- तृतीय. यशवंत पंचायत राज अभियान २०२२-२३ राज्यस्तर : जिल्हा परिषद कोल्हापूर- द्वितीय. विभागस्तरावर पंचायत समिती अक्कलकोट- प्रथम, पंचायत समिती गडहिंग्लज- द्वितीय, पंचायत समिती शिराळा-तृतीय.विभागस्तरीय विशेष पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायती : सांडपाणी व्यवस्थापनासाठी स्व. वसंतराव नाईक पुरस्कार- बनवडी (सातारा), पाणी गुणवत्ता व पाणी व्यवस्थापनासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार -वाटंगी (कोल्हापूर), शौचालय व्यवस्थापनासाठी स्व.आबासाहेब खेडकर पुरस्कार- भोसे (सोलापूर).

# कगदा मोरे महाविद्यालयात मतदार जनजागृती अभियान कार्यक्रम संपन्न




निफाड : मतदान करणे हा प्रत्येकाचा अधिकार आहे. प्रत्येकाने मतदान करून हा हक्क बजावला पाहिजे. त्यासाठी शासनाने सुरू केलेल्या मतदार नाव नोंदणी अभियानामध्ये विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेऊन आपले व परिसरातील नागरिकांची मतदार नोंदणी करावी असे आवाहन पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी बागुल यांनी महाविद्यालयातील उपस्थित विद्यार्थ्यांना केले. कर्मवीर गणपत दादा मोरे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय निफाड येथे दिनांक २ मार्च २०२४ रोजी मतदार जनजागृती अभियान हे राष्ट्रीय सेवा योजना,विद्यार्थी कल्याण मंडळ व राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आले.या कार्यक्रमासाठी निफाड पंचायत समितीचे गट शिक्षण अधिकारी .बागुल ,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए.के.शिंदे ,महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. एम.बी.वाघ , अभय वडघुले सर , अतुल आहेर, डॉ .बी सी आहेर, कांगणे , सानप, महाले,श्रीमती.एस.जी उफाडे, वैशाली गीते, डॉ स्वाती पवार, बी.बी. ताकाटे, ऋचा जगताप, ऋतुजा ढोमसे, , कैलास दाभाडे, महाविद्यालातील सर्व प्राध्यापक,विद्यार्थी उपस्थित होते . या कार्यक्रमात बागुल यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत मतदानविषयीचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले.तसेच निफाड तालुक्यातील मतदानामध्ये स्त्रियांचा सहभाग याविषयी चिंता व्यक्त केली.त्यामुळे मतदानातील तरुणांचा सहभाग वाढला पाहिजे.तसेच विद्यार्थ्यांनी आपल्या घरातील सदस्यांना देखिल मतदानविषयी जागृत करून मतदान करण्यास भाग पाडावे असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए.के.शिंदे यांनी विद्यार्थ्यांच्या मतदार नोंदणीसाठी महाविद्यालयात सुरू असलेल्या उपक्रमाविषयी माहिती दिली व जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी मतदान करण्यात सहभाग घ्यावा असे विद्यार्थ्यांना आवाहन केले.

या कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयातील २०० विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा एस. आर. ढोली यांनी केले.तसेच या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक व प्राध्यापकेतर सेवक यांनी कार्यक्रम यशस्वितेसाठी प्रयत्न केले.

# ऑल इंडिया संपादक संघ देशात सकारात्मक बदल घडवेल : सहा. आयुक्त सचिन साळे

## संपादक संघाचा पहिला वर्धापन दिन उत्साहात साजरा

कोल्हापूर/प्रतिनिधी : देशातील परिवर्तनवादी संपादकांनी एकत्र येवून स्थापण केलेला ऑल इंडिया संपादक संघ देशाला एक नवी दिशा देण्याचे काम करून निश्र्चितच सकारात्मक बदल घडवेल अशा आशावाद समाज कल्याण सहा. आयुक्त सचिन साळे यांनी व्यक्त केला. ऑल इंडिया संपादक संघाचा पहिला वर्धापन दिन ऐतिहासिक मिस् क्लार्क होस्टेल येथे विद्याथ्यांना शालेय साहित्याचे वाटप करून विधायक उपक्रमाने साजरा केला. यावेळी झालेल्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून सहा. आयुक्त साळे बोलत होते. यावेळी पीआरपीचे जिल्हाध्यक्ष दगडू भास्कर, आरपीआयचे जिल्हाध्यक्ष उत्तम कांबळे मिस् क्लार्क होस्टेलचे के. डी. कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना पीपल्स रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष दगडू भास्कर म्हणाले, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या परिवर्तनवादी व पुरोगामी विचारांच्या वाटेवर चालणारा हा संघ आहे. आज देशाची परिस्थिती पाहता महामानवांच्या विचारांची गरज पुन्हा पुन्हा भासत आहे. अशा काळात एक विचारांची ज्योत घेवून देशातील संपादक एकत्र आले आहेत. ही गौरवाची बाब आहे. या संघाकडून सर्वसामान्य जनतेला न्याय मिळेल अशी अपेक्षा व्यक्त केली.

रिपाइं (आठवले) चे जिल्हाध्यक्ष उत्तम कांबळे म्हणाले, पत्रकारांचे अनेक संघ आहेत परंतू संपादकांचा हा पहिलाच संघ आहे. लोकशाहीच्या चौर्थ्या खांबाचे सरंक्षण करण्याचे काम संपादक संघ करीत आहे. इथल्या फुटपाथवरच्या लोकांच्या व्यथेपासून ते उल्लासी जीवन जगणाऱ्या सर्वाचा यथोसांगपणे समाचार वर्तमान पत्राच्या माध्यमातून घेतला जातो. पत्रकारांच्या पत्रकारितेवर प्रश्र्नचिन्ह उभे असतांना सकारात्कम बदल घडविण्यासाठी संपादकांचा संघ निर्माण होतोय ही चांगली घटना आहे. आज सगळीकडे सर्वच क्षेत्रात मुस्कटदाबी होत असतांना या मुस्कटदाबीला उत्तर देण्याचे काम आंबेडकरी विचारांचे संपादक करतील यात शंका नाही. आज देशाला निर्भिड संपादकांची गरज आहे. कारण आजची पत्रकारिता बिकाऊ झाली आहे. त्यामुळे पत्रकारांवर विश्र्वास उरलेला नाही अशा काळात लोकशाही बळकटी करण्यासाठी संपादक संघ पुढे येत आहे. सर्वसामान्यांचा आवाज बनण्याचे काम हा संघ निश्र्चित करेल. आजच्या परिस्थितीत रामाचा बाण पाहिजे की भीमाचा पेन अशी बिकट परिस्थिती निर्माण झाली असतांना संपादक संघ भीमाच्या पेनाची प्रतारणा होणार नाही याचे भान निश्र्चित ठेवतील असे परखड मत उत्तम कांबळे यांनी व्यक्त केले.

यावेळी बोलतांना संपादक संघाचे जिल्हाध्यक्ष प्रकाश लिंगनूरकर म्हणाले, प्रिंट मिडीयातील देशातील एस.सी.एस.टी.ओबीसी संपादकांचे मजबूतपणे उभे राहिलेले पहिले संघटन आहे. संस्थापक अध्यक्ष करण बौध्द यांनी लखनऊ येथून या संघाची नोंदणी केली आहे. हा संघ कागदावर नाही तर प्रत्यक्षात देशातील उत्तरप्रदेश, झारखंड, बिहार, उत्तराखंड, मध्यप्रदेश, दिल्ली, राजस्थान, गुजरात, छत्तीसगड आदि देशातील २० हून अधिक राज्यासह महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये प्रदेशाध्यक्ष स्वप्निल कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत आहे. पुरोगामी व परिर्वतन वादी पक्ष संघटना यांना बळ देण्याचे काम संघाच्या वतीने करण्यात येत आहे. मागासवर्गीय समाजावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराला वाचा फोडण्याचे काम या संघाच्या मार्फत केले जाते. आज एस.सी., एस.टी., ओबीसी समाजावर अन्याय अत्याचार वाढत




आहेत. शासकीय कार्यालयामध्ये या वर्गातील कर्मचारी, महिला यांना जाणीवपूर्वक टार्गेट करून त्रास देण्याचा प्रयत्न केला जातो. अशा जाणीवपूर्वक त्रास देणाऱ्या अधिकाऱ्यांचा बुरखा फाडून त्यांचे खरे रूप जनतेसमोर आणण्याचे काम संपादक संघाच्या माध्यमातून केले जाईल असे मत व्यक्त केले.

यावेळी मिस् क्लार्क होस्टेलचे उपाध्यक्ष के. डी. कांबळे, रिपब्लिकन युथ फोर्सचे जिल्हाध्यक्ष रमेश कांबळे, डिगे फौडेंशनचे सदानंद डिगे, साताप्पा हेगडे, पत्रकार वैभव प्रधान यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत संपादक संघाचे सचिव दीपक कांबळे यांनी केले. यावेळी रिपाइं (आ) चे जिल्हा कार्याध्यक्ष दत्ता मिसाळ, मिस् क्लार्क होस्टेलचे संचालक राजेश माने, सुधाकर लोकरे, लॉर्ड बुध्दा चॅनेलचे दयानंद जिरगे, संपादक संघाचे अ‍ॅड. नवनीत कांबळे, सागर जमणे, उमेश मालेकर आदिसह विविध क्षेत्रातील मान्यवर विद्यार्थी उपस्थित होते.